# किमान इन्वेसिव्ह नी रिप्लेसमेंट सर्जरीचा आविष्कार

## वाशी येथील फोर्टिस सहयोगी हॉस्पिटल-हिरानंदानी हॉस्पिटलमधील ऑर्थोपेडिक्स सल्लागार डॉ. मनिष सोनटक्के यांचा लेख

**शस्त्रक्रियेनंतर** काही तासांमध्ये स्वतःहून चालणे हे नी रिप्लेसमेंट्स उपचार केलेल्या लोकांसाठी चमत्कारापेक्षा कमी नाही. याचे श्रेय नी रिप्लेसमेंट तंत्रज्ञानाने केलेल्या प्रगतीला जाते. आपल्याला गुडघ्यांची शस्त्रक्रिया व रिप्लेसमेंट प्रक्रिया झाल्याचा इतिहास असलेले अनेक लोक मॅरेथॉन्समध्ये धावताना आणि आरोग्यदायी जीवनशैली जगताना पाहायला मिळत आहेत.

**किमान इन्वेसिव्ह नी रिप्लेसमेंट सर्जरी सर्वोत्तम पर्याय आहेः**

नी रिप्लेसमेंट सर्जरी सर्वात यशस्वी आधुनिक ऑर्थोपेडिक शस्त्रक्रियांपैकी एक आहे. पण अनेक लोकांसाठी शस्त्रक्रियेशी संबंधित वेदना व इतर प्रतिकूल परिणाम अजूनही एक समस्या आहे. विशेषतः लोकांना अस्वस्थ शारीरिक थेरपीबाबत चिंता आहे, हा थेरपी उपचार स्नायूबळ व हालचाल पूर्ववत करण्यासाठी नी रिप्लेसमेंट सर्जरीनंतर आवश्यक असतो.

दुसरीकडे किमान रन्वेसिव्ह नी रिप्लेसमेंट सर्जरी पारंपारिक नी रिप्लेसमेंट शस्त्रक्रियांमधील विविध परिवर्तनांना सादर करण्यासाठी वापरली जाते. या सुधारित प्रक्रिया शस्त्रक्रियेवेळी उतींना होणारी दुखापत कमी करण्यासाठी डिझाइन करण्यात आल्या आहेत. शस्त्रक्रियेनंतर होणारी अस्वस्थता कमी करणे, जलदपणे रिकव्हरी करून डिस्चार्ज देणे आणि शारीरिक थेरपीची गरज कमी करणे हे ध्येय आहे.

**किमान इन्वेसिव्ह नी रिप्लेसमेंट सर्जरीचे फायदे पुढीलप्रमाणेः**

- त्वचा व आसपासच्या कोमल उती, तसेच स्नायू, अस्थिबंध व स्नायूबंधांचे कमी नुकसान
- शस्त्रक्रियेदरम्यान रक्त कमी जाणे
- शस्त्रक्रियेनंतर कमी वेदना
- लहानसा व्रण
- हॉस्पिटलमध्ये राहण्याचा कमी कालावधी (५-७ दिवसांच्या तुलनेत २-४ दिवस)



**पारंपारिक रिप्लेसमेंट सर्जरी आणि आधुनिक तंत्रांमधील फरकः**

पारंपारिक नी रिप्लेसमेंट सर्जरीमध्ये गुडघ्याची वाटी वळवण्यासाठी क्वॉड्रिसेप्स स्नायूबंध काढून त्याच्याजागी अर्थरिटिक जॉइण्ट बसवावे लागते. किमान इन्वेसिव्ह नी रिप्लेसमेंट सर्जरीमध्ये पारंपारिक नी रिप्लेसमेंटमधील ८ ते १० रंच भेगेच्या तुलनेत ४ ते ६ इंच भेग पाडून शस्त्रक्रिया केली जाते. खास साधनांचा वापर करून लहान भेग पाडली जाते, ज्यामुळे उतींना फारशी दुखापत होत नाही. पारंपारिक नी रिप्लेसमेंट सर्जरी क्वॉड्रिसेप्स स्नायूबंध कापून केली जाते, तर किमान इन्वेसिव्ह नी रिप्लेसमेंट सर्जरीमध्ये स्नायूबंधाची पूर्णतः काळजी घेतली जाते. गुडघ्यासाठी सबवास्टस उपचार पद्धती स्नायूंना कट करण्याऐवजी काहीसे उचलून शस्त्रक्रिया करण्याची सुविधा देते. गुडघ्याची वाटी उलटी न होता बाजूला सरकते, ज्यामुळे सर्जनला लहान भेग करता येते. यामुळे रक्तस्त्राव आणि शस्त्रक्रियेनंतर होणाऱ्या वेदना मोठ्या प्रमाणात कमी होतात. तसेच या जापचार पद्धतीमुळे आज नी रिप्लेसमेंट्स कराव्या लागणाऱ्या रुग्णांसाठी शस्त्रक्रियेनंतर ड्रेन्स व कॅथटर्स करण्याची गरज लक्षणीयरित्या कमी झाली आहे. नवीन व सुधारित ॲनेस्थिया तंत्रे, तसेच वेदनांचे व्यवस्थापन करणारे औषधोपचार व पद्धतीमुळे नी रिप्लेसमेंट सर्जरीनंतर वेदना कमी होतात आणि रिकव्हरी लवकर होते. शस्त्रक्रियेनंतर रिकव्हरी होण्याची गती स्वतःहून घेतलेल्या काळजीनुसार असते, जेथे लोक त्यांच्या दैनिदन नित्यक्रमांवर परतण्यास उत्सुक असतात.

**कोणावर किमान इन्वेसिव्ह नी रिप्लेसमेंट सर्जरी करता येऊ शकते?**

वेदनांसंदर्भात सुरू औषधोपचार, व्यायाम, वजन कमी करणे आणी लक्षणीय व्यायाम बदल यामुळे वेदना कमी होत नसतील तर व्यक्तीने नी रिप्लेसमेंट सर्जरी करावी. पुटील व्यक्तींवर किमान इन्वेसिव्ह नी रिप्लेसमेंट सर्जरी करता येऊ शकते.

- तरूण (मते भिन्ने असली तरी याचा अर्थ असा की ६५ वर्षांपेक्षा कमी वय असलेले रूग्ण)
- सडपातळ, लट्ठ नसलेले किंवा कमी स्नायू असलेले
- लहान किंवा मध्यम शरीरयष्टी असलेले. अधिक जटिलता असल्यामुळे मोठ्या प्रमाणात प्रत्यारोपणांची गरज असेलेले
- हाडे किंवा सांध्यामध्ये विकृती नसलेले. जसे गंभीर ओस्टियोपोरोससि. नॉक-नीज किंवा बो-लेग्स
- शस्त्रक्रिया व पुनर्वसनाबाबत प्रोत्साहित व उत्तम माहिती असलेले

**रुग्णाला माहिती देणे आणि त्याचे सक्षमीकरण करणे आवश्यकः**

किमान इन्वेसिव्ह नी रिप्लेसमेंट सर्जरीच्या उत्तम परिणामासाठी रुणाला त्याबाबत माहिती देणे आवश्यक आहे. शस्त्रक्रियेबाबतची माहिती माहित असणे आणि या माहितीचा उपयोग करून शस्त्रक्रिया नियोजनामध्ये सिक्र यपणे प्रतिसाद देणे महत्त्वाचे आहे. यामुळे अपेक्षित परिणाम, लाभ याबाबत वास्तविक माहिती मिळेल. नी रिप्लेसमेंट सर्जरीच्या मर्यादा माहित असणे हे शस्त्रक्रियेनंतरच्या यशस्वी परिणामासाठी महत्वाचे आहे. प्रत्येक व्यक्तीची रिकव्हरी वेगळ्या पद्धतीने होते. एकाच व्यक्तिवर करण्यात आलेल्या दोन एकसारख्या शस्त्रक्रियांमधून वेगळी रिकव्हरी असू शकते. उदाहरणार्थ, एकाच वेळी रुग्णांच्या दोन्ही गुडघ्यांवर करण्यात आलेल्या दोन नी रिलेसनेसमध्ये दोन्ही गुडघ्यांचा रिकव्हरी होण्याचा कालावधी विभिन्न असू शकतो.

(Advt.)